म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणें
विषय वां.वा.
दा. क्र. २६२५

दा.क्र. २६२५

२६२५

# स्वातंत्र्या
# लढ

IRBK-0102625
IRBK-0102625

माला पुष्प

म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य-वाङ्मय
वा. नं. १०२



२६२५

# दिल्लीचा स्वातंत्र्योत्सव

शिरीष माला
पुष्प आठवें

[ स्वतंत्र भारताच्या राजधानींत
झालेल्या स्वातंत्र्यसोहळ्याचें
वर्णन ]

वा. वा. १७३

म. ग्रं. सं. ठाणे. ग्रंथालय शाखा.
ग्रं. क्र. २६२५ नों दि .............
वि. ............ क्र. .............
वा-वा

IRBK-0102625

IRBK-0102625

किंमत
आठ आणे

चित्रशाळा प्रेस
प्रकाशन विभाग
पुणें २.

मुद्रक व प्रकाशक,
दा. त्र्यं. जोशी
चित्रशाळा प्रेस,
पुणें २.

आ वृ त्ति
प हि ली
१९४७

## शिरीष माला

१ गांधी–जीना पत्रव्यवहार ८८
२ कस्तुरबा ८६
३ लिली मोगरा ८८
४ ज्ञान–तुषार ८५
५ अमर चीन ८१०
६ सोव्हिएट राष्ट्रें व लोक ८१०
७ हिंदी स्वातंत्र्याच्या योजना ८१२

चित्रशाळा प्रेस,
प्रकाशन विभाग
पुणे २.

सं. ३८८.१५३



पं. जवाहरलाल ता. १५ ऑगस्ट रोजीं स्वातंत्र्य जाहीर झाल्यावर
फडफडणाऱ्या झेंड्याकडे पहात आहेत.

म. ग्रं. सं. ठाणें

# दिल्लीचा स्वातंत्र्योत्सव ★ ★ ★ ★

“पूर्वेच्या क्षितिजावर नव्या ताऱ्याचा उदय ता. १४ रोजीं रात्रीं १२ वाजतां झाला” असें हिंदी स्वातंत्र्याचें वर्णन पं. जवाहरलाल नेहरूंनीं केलें. ह्या ताऱ्याच्या उदयाकरतां किती तरी वर्षें वाट पहात बसावें लागलें!

तारीख १४ कधीं संपते व स्वातंत्र्याचा जयजयकार कधीं करतों, अशी आतुरता असंख्य जनसमुदायाला लागली होती. घटना-परिषदेच्या कौन्सिल हॉलभोंवतीं लोकांचा वेढा पडला होता. क्षणोक्षणीं उत्कंठा वाढत होती. लोक अधीर झाले होते.

दिल्ली हें अपयशी शहर आहे; तेथें अनेक राज्यें स्थापन झालीं व विलयाला गेलीं. ब्रिटिशांनीं कलकत्त्याहून दिल्लीला राजधानी नेली तेव्हां त्यांना हाच इषारा दिला होता. मोंगल सम्राटांचा नाश तेथेंच झाला; कौरवांचें राज्य हस्तिनापुरलाच संपलें; त्यामुळें

कोणी ही राजधानी अलाहाबादला न्यावी, नागपूरला न्यावी, मुंबईला न्यावी अशा सूचना केल्या; पण पं. जवाहरलाल व इतर पुढाऱ्यांनीं त्याला समर्पक उत्तर दिलें. दिल्लीची राजधानी ही राजांना मानवत नाहीं. तेथें राजसत्ता टिकत नाहीं. पण आम्ही लोकराज्य स्थापन करीत असल्यामुळें हें लोकराज्य नष्ट होणार नाहीं असा त्यांचा विश्वास. दिल्लीचा शाप जो बाधला तो राजांना. लोकसत्तेला दिल्ली आशीर्वादच देईल. अशा प्रकारें या कल्पनेचा निरास करण्यांत आला.

दुसरी एक अडचण मुहूर्ताची. ता. १५ रोजीं सकाळीं हा उत्सव न करतां रात्रीं कां केला? ता. १५ ला अमावास्या लागत होती. पण १४ रोजीं गुरुपुष्यामृत योग असल्यामुळें ज्योतिष्यांनीं तीच शुभ वेळ काढून दिली होती. पण ज्योतिष्यांनीं ही वेळ काढून दिली नसती तरी रात्रीची वेळच जास्त चांगली. एरवीं रोषणाई कशी करतां आली असती! स्वातंत्र्योत्सव साजरा करण्याला रात्रच चांगली. श्रीकृष्णाचा जन्म रात्रींच नाहीं का झाला! निद्रिस्त जनतेला जागें करीत, आरडत ओरडत, मशाली पाजळीत, जयध्वनि करीत स्वातंत्र्य येत होतें. तें असा पुकार करीत होतें कीं, "आतां उठा, जागे व्हा व कार्याला लागा."

दिल्ली शहर त्या दिवशीं नटलें होतें, सजलें होतें. अनेक दीपावल्या जणुं त्या दिवशीं एकत्र झाल्या होत्या. दिल्लींत अशी जागा नव्हती कीं, जेथें राष्ट्रीय ध्वज फडकत नव्हते आणि दिवे लागले नव्हते! आपलें स्वातंत्र्य आलें, जनतेचें स्वातंत्र्य

आलें, अशा आनंदांत जनता पोहत होती. त्या स्वातंत्र्याचें स्वागत करण्याकरितां लोकयात्रा निघाली होती.

दिल्लीनें अनेक उत्सव पाहिले असतील. पण ता. १४ रात्रीच्या उत्सवासारखा उत्सव पहाण्याचें भाग्य तिला पूर्वी कधीं लाभलें नव्हतें. त्या उत्सवांत राजवैभव नव्हतें, लोकवैभव होतें. पोलिसांचे आणि लष्करांचे दंडुके जनसंमर्द हटवीत नव्हता. घोडे नव्हते, हत्ती नव्हते, जरतारी पोषाख नव्हते, अंगावर दागदागिने घातलेल्या नरनारी हिंडत नव्हत्या. 'राजाची स्वारी आली, आतां हुशार रहा' अशा ललकाऱ्या नव्हत्या. लोकांचा तो उत्सव होता. ते आपल्या फाटक्या कपड्यांनीं, दीन मलीन वेषानें, पण हृदयाच्या श्रीमंतीनें जयघोष करीत होते. घरावर एकच पणती व एकच राष्ट्रध्वज लावून कांहीं आपला आनंद व्यक्त करीत होते. ही दारिद्र्यांतली श्रीमंती दिल्लींत त्या रात्रीं धामधूम करीत होती. त्या गरिबांना माउंटबॅटनकडे जायला किंवा पं. जवाहरलाल यांच्या हाताला हात लावण्याला कोणी मज्जाव करीत नव्हते. जेथें उच्चनीच भेद संपतात आणि समतेची प्रतिष्ठापना होते तेंच खरें लोकराज्य. या लोकराज्याचा सोहळा ज्यांनीं मनमुराद उपभोगला ते धन्य.


दिल्लीला एकंदर चार उत्सव झाले. पहिला १४ रोजीं रात्रीं झालेला सत्ताग्रहणाचा; दुसरा १५ रोजीं सकाळीं झालेला ध्वजारोपणाचा; तिसरा त्याच दिवशीं झालेला संध्याकाळचा परेडचा आणि चवथा ता. १६ रोजीं सकाळीं लाल किल्ल्यावर झालेला ध्वजवंदनाचा. ह्या उत्सवांपैकीं एकेक उत्सव चढत्या श्रेणीनें साजरा होत होता.

ता. १४ रोजीं ११ वाजतां घटनापरिषद् भरली होती. तो देखावा अपूर्व होता. हिंदुस्थानचे प्रतिनिधी आपल्या हातांत सार्वभौम सत्ता घेतल्याचा पुकार करणार होते. तेथें राज्याभिषेकाकरितां मंगल कलश घेतलेल्या सुवासिनी नव्हत्या; ऋत्विजांचे वेदघोष नव्हते; आंबे–केळींचीं मांगल्यें नव्हतीं; रांगोळ्या नव्हत्या; शांतिदेवतेची आराधना नव्हती; कोणताहि समारंभ नव्हता. सभासदांनीं आपण राज्यसत्ता हातांत घेतल्याचें आणि अर्ल माउंटबॅटन यांना पहिले गव्हर्नर–जनरल नेमल्याचें जाहीर केलें. पं. जवाहरलाल त्या प्रसंगीं म्हणाले, " फार पूर्वी आपण विधात्याबरोबर संकेत केला होता आणि त्या संकेताप्रमाणें प्रतिज्ञापूर्तीची वेळ आतां आली आहे. ती प्रतिज्ञा संपूर्णपणें आपण सिद्धीस नेऊं शकलों नसलों तरी बऱ्याच मोठ्या प्रमाणांत आपण ती सिद्ध केली आहे.

" सारें विश्व निद्रामग्न असतां, मध्यरात्रीचा टोला पडतांच, हिंदुस्थान नव्या जीवनामध्यें आणि स्वातंत्र्यामध्यें जागा होईल. एक क्षण येतो, पण इतिहासांत तो क्वचित् येत असतो, ज्या वेळीं आपण जुन्या काळांतून नव्या काळांत पदार्पण करतों, ज्या वेळीं एका युगाचा अंत होतो आणि चिरकाल दडपून टाकल्या गेलेल्या आत्म्याला वाचा फुटते. अशा या मंगल मुहूर्तावर आपण हिंदुस्थानच्या व हिंदुस्थानांतील लोकांच्या आणि त्याहीपेक्षां विशाल अशा मानव्याच्या सेवेला वाहून घेण्याची प्रतिज्ञा करीत आहोंत हें अत्यंत उचित आहे.

" तो भविष्यकाल स्वास्थ्याचा किंवा विश्रांतीचा नाहीं.

म. ग्रं.



डॉ. राजेंद्रप्रसाद ता. १५ ऑगस्ट रोजीं पटना-परिषदेंत भाषण करीत आहेत

आपण आतांपर्यंत ज्या प्रतिज्ञा केल्या आहेत, व आतां जी प्रतिज्ञा करीत आहोंत त्या सर्वांच्या पूर्तीकरतां आपल्याला अविश्रांत झटलें पाहिजे. हिंदुस्थानची सेवा याचा अर्थ कोट्यवधि दुःखी हिंदी लोकांची सेवा. त्याचा अर्थ दारिद्र्य, अज्ञान, रोग व विषमतेचा अंत. आपल्या पिढींतला सर्वांत मोठा जो पुरुष त्याची महत्त्वाकांक्षा प्रत्येकाच्या डोळ्यांतील प्रत्येक अश्रुबिंदू पुसून टाकावा अशी आहे. आपल्या ते शक्तीबाहेर आहे; पण जोंवर अश्रु आहेत आणि क्लेश आहेत, तोंवर आपलें काम पुरें होणार नाहीं.

“ज्या हिंदुस्थानचे तुम्ही प्रतिनिधी आहांत, त्या तुम्हांला, आम्ही विनंती करतों कीं, या आमच्या विराट कार्यांत तुम्ही समाविष्ट व्हा, श्रद्धा व विश्वासानें समाविष्ट व्हा. ही वेळ क्षुद्र व विध्वंसक टीकेची नाहीं. ही वेळ वैराची किंवा दुसऱ्याचे दोष काढण्याची नाहीं.

“हिंदुस्थानांतील सर्वांचा समावेश होईल अशी आपल्याला एक भव्य इमारत बांधावयाची आहे.”

डॉ. राजेंद्रप्रसाद म्हणाले, “ह्या इतिहासांतील गंभीर प्रसंगीं, अनेक वर्षांच्या लढ्यानंतर, हातांत सत्ता घेत असतां आपण अत्यंत विनम्रपणें जी शक्ति व्यक्तींच्या व राष्ट्राच्या दैवाची घटना घडवीत असते, तिला कृतज्ञतापूर्वक अभिवादन करूं या. ज्या ज्ञात व अज्ञात स्त्रीपुरुषांनीं हंसत हंसत मृत्यूला कवटाळलें किंवा बंदुकीच्या गोळ्यांपुढें आपल्या छात्या उघड्या केल्या, ज्यांनीं अंदमानच्या कोठड्यांत जिवंत मृत्यु अनुभवला अगर

येथील तुरुंगांत दीर्घकालीन शिक्षा भोगली, ज्यांनीं स्वदेशांतल्या अवमानीत जीवनापेक्षां परदेशांतील हद्दपारी पत्करली, ज्यांनीं आजच्या ह्या सिद्ध झालेल्या महान् ध्येयाकरतां आपल्या संपत्तीचा त्याग केला एवढेंच नव्हे तर आपल्या प्रेमळ नातेवाइकांचाहि विरह सहन केला, त्यांचें आपण कृतज्ञतापूर्वक स्मरण करूं या.

" म. गांधी हे गेलीं ३० वर्षें आपल्या प्रवासांतील मार्गदर्शक प्रकाश, आपले वाटाडे आणि तत्त्वज्ञ होते, त्यांना आपण अभिवादन करूं या. त्यांनींच आपल्याला निराशेच्या गर्तेंतून वर काढलें आणि आपल्यांत एक जीवनरस ओतला. त्यामुळेंच आपण न्यायाकरतां आणि स्वातंत्र्याच्या जन्मसिद्ध हक्काकरतां खंबीरपणें उभे राहिलों. त्यांनीं आपल्या हातांत सत्य–अहिंसेचें अमोघ शस्त्र दिलें आणि त्यामुळेंच आपण आज स्वराज्य संपादन केलें आहे. ज्या साधनानें हिंदुस्थान जागृत व कार्यप्रवण झाला त्या साधनाची उपेक्षा आपण करणार नाहीं अशी आशा या विजयोत्सवाच्या प्रसंगीं आपण करूं या. आपण जगाला सांगूं या कीं, आम्ही आमच्या ऐतिहासिक परंपरेपासून च्युत होणार नाहीं. सर्वांशीं मित्रत्वानें व प्रेमानें वागूं. आमची एकच महत्त्वाकांक्षा आहे; सर्वांच्या मुक्ततेच्या प्रयत्नांत अंशभागी होणें आणि जगांत शांतता नांदावी म्हणून प्रयत्न करणें.

" युद्धानें विस्कळीत झालेल्या जगाच्या पुनर्रचनेमध्यें व घडणीमध्यें हिंदुस्थानला महत्त्वाचें कार्य करावयाचें आहे. हें कार्य करतांना आम्ही शस्त्रास्त्रांकरतां चाललेली शर्यत आणि नव्या

नव्या परिणामकारक विध्वंसक साधनांचा शोध यांत भागिदार होणार नाहीं. आतां हिंदुस्थानला, युद्ध व रक्तपाताऐवजीं, मृत्यु आणि संहाराऐवजीं आपलें अमोघ साधन जगानें स्वीकारावें म्हणून पुरस्कार करण्याची संधि लाभली आहे.

" आपण एका महान् कार्याला आरंभ करीत आहों. या कार्याकरतां आमची सारी जनता आपली अमर्याद शक्ति आणि हार्दिक सहकार्य आम्हांला देईल व सर्व धर्मांच्या व जातींच्या लोकांची सहानुभूति व पाठिंबा आम्हांला मिळेल अशी आम्ही आशा बाळगतों. त्याकरतां लायक होण्यास आम्ही आमची शिकस्त करूं. "

घटना–परिषदेच्या या अपूर्व व क्रांतिकारक बैठकीला ' वंदे मातरम् 'नें सुरुवात झाली. राष्ट्रपतींच्या पत्नी सौ. सुचिता कृपलानी यांनीं तें गीत गायिलें. समारंभाला जमलेले चित्र-विचित्र पोषाखांचे स्त्री–पुरुष गंभीरपणें उभे राहिले. अधि-काऱ्यांच्या स्त्रिया नटून थटून उंच उंच रेशमी जरतारी पोषाख घालून तेथें हजर होत्या. असेंब्ली-सभासद आपापल्या स्त्रिया घेऊन दूरदुरून आले होते. पण त्यांची तितकी ऐट नव्हती. त्या खादींत होत्या. पुरुषहि खादींत होते. खादीचा तेथें वरचष्मा होता. पोषाखांतहि बदल झाला होता. हॅट, नेकटॉय व कॉलर यांचा तेथें अभावच होता. नवा राष्ट्रीय पोषाख निर्माण केला जात होता. गांधी टोपी, अचकन व सुरवार असा पोषाख बहुतेक राष्ट्रीय समारंभाचा पोषाख ठरेल. हाच पोषाख नवे मंत्री पेहरून आले होते. सभागृहांत विद्युद्दीपांचा लखलखाट किती

असेल याची कल्पनाच केलेली चांगली. तेथें चित्रांकरितां मोठ-मोठ्या चौकटी होत्या व त्यावर परवां परवांपर्यंत बड्या अधिकाऱ्यांच्या तसबिरी असत; पण आज हीं सारीं चित्रें गुंडाळून ठेवलीं होतीं व त्यांची जागा राष्ट्रध्वजानें घेतली होती.

बाहेर जमलेल्या जनसंमर्दाला हें राष्ट्रीय वैभव पहाण्याचें दृष्टि-सुख लाभलें नाहीं. त्या बिचाऱ्यांना बाहेर दमट हवेंत उभें राहावें लागलें. मात्र त्यांच्याकरितां दूरध्वनिक्षेपक यंत्राची व्यवस्था केली होती.

'वंदे मातरम्' गायिलें गेलें. पण राष्ट्रगीत म्हणून नव्हे. त्यानंतर राजेंद्रबाबूंनीं प्रथम हिंदींत भाषण केलें आणि नंतर दहा मिनिटें ते इंग्रजींत बोलले. गांधींच्या नांवाचा त्यांनीं उल्लेख केला, तेव्हां टाळ्यांचा कडकडाट झाला. 'आपला मार्गदर्शक प्रकाश, आपला वाटाड्या आणि आपला द्रष्टा' असें त्यांना संबोधिलें. पाकिस्तानांतील विभक्त बांधवांच्या विरहाबद्दल खेद व्यक्त करतांना सर्वचजण हळहळले. त्यानंतर दोन मिनिटें सर्व सभागृह हुतात्म्यांच्या स्मृतीकरतां उभें राहिलें.

हा प्रास्ताविक भाग संपल्यावर पंडित नेहरू हे व्यासपीठावर आले. त्यांच्या चेहऱ्यावर आनंदमिश्रित गांभीर्य होतें. त्यांनीं सभासदांनीं घ्यावयाच्या शपथेचा ठराव संमतीकरतां पुढें मांडला. "आपण कोट्यवधि लोकांच्या सेवेकरतां आज प्रतिज्ञाबद्ध आहोंत. आपण स्वतंत्र भारताची अशी भव्य इमारत बांधणार आहोंत कीं, जींत सर्वांना रहातां येईल" असें ते म्हणाले. या प्रतिज्ञेच्या ठरावाला लीगचे पुढारी चौधरी खलीकउज्जमान यांनीं दुजोरा दिला.

त्यानंतर हिंदुस्थानचे तत्त्वज्ञ राधाकृष्णन् यांनीं अत्युत्कृष्ट भाषण केलें. रागद्वेषविवर्जित होऊन आपण संस्कृति–संवर्धन केलें पाहिजे असें ते म्हणाले. राधाकृष्णन्‌च्या भाषणानंतर प्रतिज्ञेचा मसुदा निरनिराळ्या भाषांतून उच्चारला गेला व तो मान्य झाला. इतक्यांत बारा वाजले. हिंदुस्थानच्या क्रांतीचा व भाग्याचा क्षण आला.

बाहेर मांगल्यसूचक शंख वाजूं लागले आणि पारतंत्र्याच्या उदरांतून जन्माला आलेल्या स्वातंत्र्यानें पहिला जो टाहो फोडला तो " महात्मा गांधी की जय " या घोषणेचा. गांधींच्या जय-घोषानें सारी दिल्ली बारा वाजतां निनादित झाली. आंत बाहेर एकच जयध्वनि उठला. जनता गांधीवेडी झाली होती. स्वतंत्र भारताचा तो जनक, तो उद्धारक, तो मार्गदर्शक सर्वांच्या हृदयांत जागा होता.

हा जयध्वनि थांबल्यावर सर्व सभासद उठले व त्यांनीं हिंदी राजनिष्ठेच्या शपथा घेतल्या.

> " मी घटना–परिषदेचा सभासद अशी शपथ घेतों कीं, ह्या पुरातन भूमीला जगामध्यें हक्काचें स्थान प्राप्त व्हावें आणि तिनें जगाच्या शांततेकरतां व मानवाच्या कल्याणाकरतां झटावें म्हणून मी माझें जीवित अत्यंत नम्रपणें हिंदुस्थानच्या व हिंदी जनतेच्या सेवेकरतां अर्पण करीत आहें. "

हा शपथविधि झाल्यावर ' आम्ही घटना–परिषदेच्या सभासदांनीं हिंदुस्थानचा राज्यकारभार हातीं घेतला आहे ' हें व्हाइसरॉयना कळविण्याचा ठराव सभेपुढें अध्यक्षांनीं मांडला.

त्याबरोबर चहूंकडे टाळ्यांचा कडकडाट झाला. एका वाक्यानें हिंदुस्थानांत क्रांति झाली, हातीं सत्ता आली. जयजयकार तर चहूंकडे चालूंच होता.

त्यानंतर लॉर्ड माउंटबॅटन यांना पहिले गव्हर्नर–जनरल नेमण्याचा ठराव आला, तेव्हां असाच टाळ्यांचा कडकडाट झाला. सत्ता-संक्रमणाचा हा सोहळा पार पडल्यावर सौ. हंसा मेहता यांनीं हिंदी स्त्रियांमार्फत राष्ट्रध्वज अर्पण केला. सभेच्या शेवटीं ' जनमनगण ' व ' सारे जहांसे अच्छा ' हीं गीतें झालीं व सभा संपली.

नंतर राजेंद्रबाबू व पं. जवाहरलाल माउंटबॅटनकडे गेले व त्यांनीं त्यांना गव्हर्नर–जनरल नेमल्याचें सांगितलें. इकडे सभा संपल्यावर घटना–परिषदेच्या सभागृहावर सौ. हंसा मेहतांनीं अर्पण केलेला राष्ट्रध्वज फडकवण्यांत आला.

रात्रभर दिल्लींत जयघोष व उत्सव सुरूं होते. मिरवणुका, दीपोत्सव, झेंडावंदनें यांना विराम नव्हता. रात्रीं कोणी निजलें असेल असें वाटत नाहीं.

## ता. १५ चा समारंभ

ता. १५ रोजीं सकाळपासूनच लोकांच्या झुंडीच्या झुंडी घटना–परिषदेच्या सभागृहाकडे लोटत होत्या. त्यांच्या अंतः-करणांत कधीं सुखाच्या, कधीं दुःखाच्या, कधीं कृतज्ञतेच्या तर कधीं असहाय्यतेच्या भावना उसळत होत्या. ता. १५ चा दिवस हा हिंदुस्थानच्या इतिहासांत राजदिवस. स्वातंत्र्य–संपा-दनाचा तो पहिला दिवस. तो दिवाळीचा, दसऱ्याचा, पाडव्याचा

२६२५



जी काय भव्य कल्पना कराल त्याचा दिवस. कवींनीं त्या दिवसावर असंख्य काव्यें करावीं, तत्त्वज्ञांनीं सूत्रपर भाष्यें लिहावीं, नाटककारांनीं नाटकें लिहावीं, सिनेमानीं चित्रपट काढावेत आणि सामान्य जनतेनें हर्षभरित व्हावें असा तो दिवस होता. त्या सोनेरी दिवसाची कडा थोडीशी काळवंडली होती हें खरें. पण पराक्रमाच्या संचाराला पराभवाचें शल्य हें कःपदार्थ वाटतें.

सकाळीं ९ वाजतां व्हाइसरॉयच्या दरबारगृहांत अर्ल माउंटबॅटन व सर्व प्रधानमंत्री यांचा शपथविधि होणार होता. दरबारगृहावर दोन मोठीं निशाणें फडकत होतीं. एक राष्ट्रीय निशाण व दुसरें ग. जनरलचें निशाण. तें निशाण गडद निळ्या रंगाचें होतें. त्याशिवाय स्टार ऑफ इंडियाचें एक निशाण होतें. या दरबारला सारे सरकारी अधिकारी हजर होते. कांहीं राजेरजवाडे आणि सर्व परराष्ट्रीय वकील यांनाहि पाचारण करण्यांत आलें होतें.

हिंदुस्थान पूर्णपणें स्वतंत्र झाला नव्हता. त्यामुळें गव्हर्नर–जनरलनें जी प्रतिज्ञा घेतली ती आपण इंग्लंडच्या राजाला व त्यांच्या वारसांना राजनिष्ठ राहूं अशी घेतली. पण पंडित नेहरू व इतर मंत्र्यांनीं हिंदुस्थानाला राजनिष्ठ राहूं अशी प्रतिज्ञा घेतली.

गव्हर्नर–जनरलला प्रतिज्ञा देण्याचें पौरोहित्य फेडरल कोर्टाचे चीफ जस्टिस श्री. हिरालाल कनिया यांनीं केलें. त्यांनीं डोक्यावर गुजराती तांबडी पगडी घातली होती व काळा पोषाख केला होता. मंत्र्यांना प्रतिज्ञाबद्ध करण्याचें काम अर्ल माउंटबॅटन

यांनीं केलें. मंत्र्यांच्या शपथेंत पुढील वाक्य होतें. " आम्ही कायद्यानें प्रस्थापित अशा घटनेचें पालन निष्ठेनें व श्रद्धेनें करूं. तसेंच रागद्वेष अगर भीति, दया यांनीं बाधित न होतां सर्व प्रकारच्या हिंदी जनतेला कायद्यानें व रूढीनें न्याय्य रीतीनें वागवूं. "

हा शपथविधि झाल्यावर गव्हर्नर जनरल मंत्र्यांसह मिरवणुकीनें घटनापरिषदेच्या सभागृहाकडे जावयाचे होते. गव्हर्नर जनरलकरतां सहा चेस्टनट रंगांच्या घोड्यांची गाडी सज्ज केली होती. त्यांच्या गाडीपुढें सर्व मंत्री व इतर बडे अधिकारी होते. तें चार फर्लांगचें अंतर काटणें अशक्य झालें. लोकांचा जमाव इतका उसळला होता कीं, गाड्यांना वाट काढणें अशक्य झालें. पं. जवाहरलालनीं आपली गाडी तशा गर्दींत पुढें काढली. ते घटना–परिषदेच्या सभागृहावरील गच्चींत गेले व तेथून जनतेला ' मागें सरा ' असा हातानें इषारा देऊं लागले. पण लोक कसले ऐकतात. त्यांनीं साऱ्या सांखळ्या तोडल्या. ते माउंटबॅटन यांच्या व त्यांच्या पत्नीच्या जवळ गेले. प्रत्येकजण त्यांच्याशीं हस्तांदोलन करण्यास उत्सुक झाला होता. माउंटबॅटन हे पूर्वींचे व्हाइसरॉय असते तर त्यांना जनतेचा स्पर्शहि होता ना. लष्करानें लोकांचा रस्ता रोखला असता, पण १५ तारखेला तो भेदभाव उरला नव्हता. माउंटबॅटन हे जनतेचे गव्हर्नर–जनरल झाले होते. त्यांच्या रक्षणाची जबाबदारी जनतेवर होती. पूर्वींचे गव्हर्नर–जनरल कोणी बॉंब टाकील का, कोणी पिस्तूल झाडील का, अशा चिंतेंत असत; पण नवे गव्हर्नर–जनरल हे भयमुक्त होते.

त्यांनाहि हा उत्साह पाहून आनंदाचें भरतें आलें. स्वतंत्र हिंदुस्थानचें हें प्रेमाचें स्वागत कुठें आणि परतंत्र हिंदुस्थानांतील तें जुलमाचें स्वागत कुठें !

मिरवणुकीच्या बंदोबस्ताकरितां ठेवलेले सैनिक व पोलिस हे आपली कामगिरी विसरले आणि तेहि लोकांत मिसळून ' जय हिंद ' चा पुकार करूं लागले. हे जयध्वनि ऐकत आणि हस्तांदोलन करीत अर्ल माउंटबॅटन सभागृहीं पोहोंचले.

## घटना–परिषदेंत

घटना–परिषदेंत सभासद, परराष्ट्रीय वकील आणि ६०० प्रेक्षक होते. अर्ल माउंटबॅटनना जेव्हां राजेंद्रबाबू व जवाहरलाल घेऊन आंत आले तेव्हां सभागृह जय हिंद, म. गांधी वगैरेंच्या जयजयकारानें हादरून गेलें. टाळ्यांचा कडकडाट तर अविराम चालू होता.

राजेंद्रबाबूंनीं सभेला सुरुवात केली. त्यांनीं जगांतील राष्ट्रांचे शुभेच्छाप्रदर्शक संदेश वाचून दाखविले. त्या संदेशांत इंग्लंड, अमेरिका, चीन वगैरेंचे संदेश होते. नंतर माउंटबॅटन यांनीं इंग्लंडच्या राजाचा संदेश वाचला. त्यांत त्यांनीं म्हटलें होतें कीं, " तुम्ही तुमच्या प्रजेच्या ऐश्वर्याकरतां आणि मानवतेच्या कल्याणाकरतां जे जे प्रयत्न कराल त्याला माझी सहानुभूति राहील. " पूर्वीच्या राजसंदेशांत ' माझ्या प्रजेच्या ' असे शब्द असत. पण नव्या संदेशांत ' तुमच्या प्रजेच्या ' असा शब्दप्रयोग होता. लोकशाही राज्यव्यवस्थेला अनुसरूनच ते शब्द होते. हा संदेश वाचून झाल्यावर माउंटबॅटन यांनीं बोलावयास सुरुवात केली.

" हिंदुस्थान अखंड राहिला नसल्यामुळें आजच्या आनंदाला दुःखाची छटा आली आहे. हिंदुस्थानाच्या संघांत बहुतेक सर्व संस्थानिक सामील झाले आहेत. हैद्राबादनें पाकिस्तानांत न जाण्याचें ठरविलें आहे. तो हिंदुस्थानबरोबर तडजोडीची बोलणी करणार आहे. मी आजपासून तुम्ही नेमलेला गव्हर्नर–जनरल झालों आहे. तेव्हां तुम्ही मला तुमच्यांतलाच एक समजा. ३१ मार्च १९४८ रोजीं मध्यंतराची मुदत संपली म्हणजे मला सेवानिवृत्त करा. मी एप्रिलमध्यें परत जाईन.

" तुमच्यापुढील कार्य अत्यंत बिकट आहे. दोन वर्षांपूर्वीच युद्ध संपलें. बरोबर दोन वर्षांपूर्वी याच दिवशीं मी हिंदुस्थानचे परम मित्र मि. ॲटली यांच्या समवेत होतों. त्या वेळीं जपानच्या शरणागतीची बातमी आली. तो दिवस आनंदाचा व कृतज्ञता व्यक्त करण्याचा होता; कारण सहा वर्षांच्या कत्तलीचा आणि विध्वंसाचा शेवट त्या वेळीं झाला होता. पण हिंदुस्थानांत आपण त्याहीपेक्षां मोठी कामगिरी केली आहे. त्या कामगिरीला युद्धाशिवाय झालेला शांततेचा तह असें योग्य रीतीनें संबोधतात....या ऐतिहासिक प्रसंगीं हिंदुस्थान जें महात्मा गांधींचें––त्या अहिंसेनें स्वातंत्र्य मिळविणाऱ्या शिल्पकाराचें–ऋण लागतो, त्याचें विस्मरण होऊं देणार नाहीं. ते आज येथें हजर नाहींत; पण आपल्या मनांत त्यांचें वास्तव्य किती आहे हें आपण त्यांना विदित करूं या.

" तुमचे पहिले पंतप्रधान पं. जवाहरलाल नेहरू हे अत्यंत धैर्यशाली व दूरदृष्टीचे जगविख्यात नेते आहेत. त्यांचा विश्वास व

त्यांची मैत्री माझ्या कार्यांत अत्यंत उपयुक्त ठरली. त्यांच्या सामर्थ्यशाली नेतृत्वानें, त्यांच्या सहकाऱ्यांच्या मदतीनें आणि जनतेच्या निष्ठापूर्ण सहकारितेनें हिंदुस्थान जगांतील राष्ट्रांत आपलें योग्य स्थान प्राप्त करून घेईल यांत शंका नाहीं."

माउंटबॅटननंतर राजेंद्रबाबू उठले. ते म्हणाले, "आजचा दिवस हा खरोखर आनंदाचा आहे. पण या आनंदावर एकाच गोष्टीमुळें थोडें विरजण पडलें आहे. जो हिंदुस्थान परमेश्वरानें आणि निसर्गानें एक बनवला होता आणि संस्कृति व परंपरेनें आणि लाखों वर्षांच्या इतिहासानें अखंड होता तो आज विभागला आहे. आपण अशी आशा व प्रार्थना करूं या कीं, ज्यांनीं ह्या फाळणीचा आग्रह धरला आणि ती घडवून आणली, त्यांनाहि ह्या प्रकृतिसिद्ध ऐक्याची जाणीव होईल आणि ते व आपण पुनः एक होऊं. हें ऐक्य बळजबरीनें होणार नाहीं, तें उदार अंतःकरणानें आणि सहकार्यानें होईल. आपला कारभार आपण असा चालवूं या कीं, जे आपल्यांतून गेले आहेत, त्यांना परत येण्याचा मोह व्हावा. कोणाला हें स्वप्न वाटेल; पण हिंदुस्थानची विभागणी हेंहि स्वप्नच नव्हतें का? तें जर खरें ठरूं शकलें तर हें आपल्या कल्पनेपेक्षां लवकर खरें कां ठरणार नाहीं?


"आजचा हा दिवस आनंदापेक्षांहि आपल्या स्वप्नाप्रमाणें हिंदुस्थानची उभारणी करण्याकरतां सेवेला वाहून घेण्याचा आहे. भूतकाळाकडे पाठ वळवूं या व भविष्यकाळावर नजर रोखूं या. आपलें कोणत्याहि देशाशीं वैर नाहीं आणि कोणीहि आप-

त्याशीं वैर उकरून काढूं नये. परंपरा व इतिहासानें आपण शांतताप्रिय आहों आणि हिंदुस्थानला जगाशीं शांततेनें वागावयाचें आहे. हिंदी साम्राज्यें हीं निराळ्या प्रकारचीं होतीं. हिंदुस्थानचे विजय हे आध्यात्मिक होते. त्या विजयांनीं कोणालाहि लोह किंवा सुवर्णशृंखलांनीं बद्ध केलें नाहीं. आम्ही परक्या देशांना व परक्या लोकांना अधिक टिकाऊ अशा सोनेरी रेशमाच्या रज्जूंनीं बांधलें. हे रज्जू संस्कृति, सुधारणा, धर्म व ज्ञानाचे होते.


"आपण तीच परंपरा चालवूं या. ज्या निशाणाखालीं आपण विजयी झालों, तेंच निशाण उंच उभारूं या आणि ज्या अहिंसेनें आपण हा अपूर्व विजय-संपादन केला, त्याच अहिंसेचें शस्त्र व्यावहारिक रीत्या जगाच्या हातांत देऊं या.

"आपण अशी परिस्थिति निर्माण करण्याचा निश्चय करूं या कीं, जेव्हां प्रत्येक मनुष्य हा स्वतंत्र होईल आणि त्याची पूर्ण वाढ होण्यास त्याला आवश्यक साधनें उपलब्ध होतील; दारिद्र्य, दैन्य, अज्ञान व रोग जेव्हां नष्ट होतील; जेव्हां उच्च नीच; गरीब श्रीमंत हा भेदाभेद रहाणार नाहीं; जेव्हां धर्म हा माणसामाणसांना एकत्र आणणारी शक्ति होईल; जेव्हां अस्पृश्यता हें एक विसरलेलें निशास्वप्न होईल; जेव्हां मनुष्य मनुष्याला लुबाडणार नाहीं; जेव्हां हिंदुस्थानांतील आदिम जातींना व मागासलेल्या वर्गांना इतरांबरोबर येण्याकरतां सवलती व खास व्यवस्था केली जाईल; जेव्हां हिंदुस्थानांत कोट्यवधि लोकांना पुरेसें अन्न मिळेल, एवढेंच नव्हे तर येथें पुनः दुग्धसरिता वाहूं लागतील;

म. ग्रं. सं. ठाणे.



असेंब्ली हॉलवरील ता. १५ ऑगस्ट रोजीं फडकणारा झेंडा



स्वातंत्र्यदिनाच्या मिरवणुकीचा देखावा

जेव्हां स्त्रीपुरुष शेतावर व कारखान्यांत हंसत काम करतील; जेव्हां प्रत्येक झोपडींत आणि खेड्यांत ग्रामोद्योगाचें मधुर संगीत ऐकूं येईल आणि जेव्हां ग्रामतरुणी त्या संगीताशीं आपल्या कंठांतील संगीताची साथ देतील; जेव्हां सूर्य चंद्र आनंदी गृहावर आणि प्रेमपूर्ण वदनावर प्रकाशमान होतील. हें साध्य करण्याकरतां आपल्यांत ध्येयवाद व त्याग पाहिजे; बुद्धिमत्ता व दीर्घोद्योग पाहिजे, संघटित होण्याकरतां शक्ति व निश्चय पाहिजे....सर्वांनीं हें ध्यानांत ठेवलें पाहिजे कीं, आज जर कशाची जरूरी असेल तर ती विधायक प्रवृत्तीची. आज झगडे नको आहेत, तार्किक वादविवादाची जरूरी नाहीं. भक्कम कामाची आज जरुरी आहे.

" शेतकऱ्यांनीं अधिक धान्य पिकवलें पाहिजे; कामकऱ्यांनीं अधिक माल काढला पाहिजे; उद्योगधंदावाल्यांनीं आपली बुद्धि, युक्ति व योजकता सार्वजनिक कल्याणाकरतां खर्चीं घातली पाहिजे. जे आजपर्यंत शास्ते व नियामक होते ते आतां सेवक झाले पाहिजेत. आपल्या सैनिकांनीं, नाविकांनीं व वैमानिकांनीं आतां हें लक्षांत ठेवलें पाहिजे कीं, त्यांना राष्ट्राच्या स्वातंत्र्याचेंच रक्षण करावयाचें नसून नवीन जीवनाच्या उभारणीला मदत करावयाची आहे.

" सरकारी नोकरांनीं जुना काळ विसरला पाहिजे. त्यांनीं आपण राज्यकर्ते नसून सेवक आहोंत हें ध्यानांत ठेवलें पाहिजे.

" जे हिंदी संघराज्यांत सामील झाले त्या संस्थानिकांचें आम्ही भ्रातृभावानें स्वागत करतों. आम्ही संस्थानिकांना

आश्वासन देतों कीं, आमच्या मनांत त्यांच्याविषयीं पाप नाहीं. आमचा विश्वास आहे कीं, ते इंग्लंडच्या राजाप्रमाणें सनदशीर राजे बनतील.

" आम्ही अल्पसंख्याकांना आश्वासन देतों कीं, त्यांना न्याय्य व योग्य वागणूक मिळेल आणि त्यांच्या हक्कांचा आदर व रक्षण केलें जाईल.

" हें सर्व साधण्याकरतां राष्ट्राच्या सेवेला वाहून घेण्याचा आपण निश्चय करूं या. कार्य फार प्रचंड आहे व वेळ अनुकूल आहे. तें कार्य सिद्धीस नेण्याला आपल्याला शक्ति, बुद्धि व धृति लाभो अशी प्रार्थना करूं या. "

त्यानंतर राष्ट्रध्वज फडकला आणि त्याला ३१ तोफांची सलामी देण्यांत आली. लोकांनीं जयध्वनीची गर्जना केली व टाळ्या वाजवल्या. त्याच वेळीं सरकारी कचेऱ्यांवरील युनियन जॅक खालीं घेण्यांत आले. अशा प्रकारें ध्वजारोपणाचा समारंभ संपला व सर्वजण शांतपणें घरोघर निघून गेले.

## तिसरा समारंभ

ह्या दोन्ही समारंभांपेक्षां लोकांच्या दृष्टीनें अधिक महत्त्वाचा समारंभ म्हणजे परेड ग्राउंडवरील झेंडावंदनाचा. त्या वेळीं राष्ट्रीय निशाणाला सैनिकांची व पोलिसांची सलामी होणार होती. दुपारपासूनच लोकांच्या झुंडीच्या झुंडी तेथें लोटत होत्या. त्या परेडमैदानावर एक हजारावर निमंत्रितांकरतां खुर्च्या ठेवल्या होत्या. पण जनसमुदायानें त्या सर्व खुर्च्या केव्हांच अडवून टाकल्या. लष्करी अधिकाऱ्यांनीं हा समारंभ विशेष थाटानें

करण्याचें योजिलें होतें. त्यांनीं चांगली आंखणीहि त्याकरतां केली होती. स्वतंत्र हिंदुस्थानांतल्या नागरिकांना शिस्तीचे धडे अद्याप शिकावयाचे होते. पुरे चोवीस तासहि त्यांना जन्मून झाले नव्हते. आनंदानें वेडावलेल्या जनसंमर्दानें शिस्त वगैरे गुंडाळून ठेवली. त्याचा परिणाम असा झाला कीं, त्या ठिकाणीं ठरल्याप्रमाणें लष्करी सलामी होऊं शकली नाहीं.

पण झेंडावंदनाचा कार्यक्रम मात्र पार पडला. लोकांचा समुद्र तेथें पसरला होता. लाटांवर लाटा याव्यात त्याप्रमाणें तो समुद्र उसळत होता. जवाहरलाल नेहरू, वल्लभभाई वगैरेंकरतां एक उच्चासन तयार केलें होतें. तेथें पुढारी उभे राहिले होते. गव्हर्नर–जनरलची मुलगी पॅमेला ही त्या गर्दींत सांपडल्याचें जवाहरलालनीं बघितलें. त्याबरोबर ते तीरासारखे धांवत गेले व त्यांनीं तिला पकडून उच्चासनावर आणलें. नंतर पति–पत्नी माउंटबॅटन तेथें आले. त्यांना हा लोकांचा उत्साह पाहून आनंदच वाटला. ' ह्याला खरी परेड म्हणतात ' असें माउंटबॅटन म्हणाले.

वर विमानें भ्रमण करीत होतीं आणि खालीं निशाण मुक्त होत होतें ! पांच लाखांवर लोक तेथें जमले होते.

कॉंग्रेसमध्यें ज्या प्रकारचें ध्वजारोहण आपण करतों तसें हें ध्वजारोहण नसतें. झेंडा वर दोरीला गुंडाळलेला असतो व तो ठराविक वेळीं मोकळा करण्यांत येतो. त्याला Breaking the flag म्हणतात. अर्थात् त्या पद्धतींत बदल करण्याची सत्ता आपल्याला आहे. पण जर साऱ्या स्वतंत्र राष्ट्रांत हीच पद्धत असेल तर तीच आपल्याला स्वीकारावी लागेल. तेथें

'वंदे मातरम्' नसतें आणि 'झेंडा ऊंचा रहे हमारा' हें गीतहि नसतें.

ज्या वेळीं परेड—मैदानावर हा झेंडा फडकला, त्या वेळीं नेमकें आकाशांत इंद्रधनुष्य पडलें. भाविक लोक म्हणूं लागले, 'ईश्वरानेंहि आकाशांत झेंडा फडकवला.' तो शुभशकुन होता. त्या इंद्रधनुष्यावरील रंग आपल्या राष्ट्रीय ध्वजाच्या रंगासारखेच दिसत होते.

हा समारंभ संपवून माउंटबॅटन व जवाहरलाल परत जात असतां त्यांना दोन बायका व एक मूल गर्दींत चिरडलें जांत आहे असें दिसलें. त्याबरोबर त्या दोघांनीं त्या स्त्रियांना व मुलाला आपल्या गाडींत घेतलें व गव्हर्नमेंट हाउसवर नेलें.


रात्रीं दिल्लीमध्यें दारूकाम सोडण्यांत आलें. प्रत्येक घरावर दिवे तर लावलेच होते. सरकारी इमारतीहि रंगीबेरंगी दिव्यांनीं सुशोभित करण्यांत आल्या होत्या. हा दीपोत्सव पहाण्याकरितां लोकांच्या झुंडी लोटत होत्या. मध्यरात्रभर रात्रींचा दिवस दिल्लींत झाला होता.

## लाल किल्ल्यावर निशाण !

या तीनहि समारंभांपेक्षां लाल किल्ल्यावर झेंडा उभारण्याचा जो समारंभ झाला, तो अत्यंत संस्मरणीय असा झाला. त्या समारंभाला अगणित समाज लोटला होता. गणती करणारांनीं साडेसात लाख लोक हजर होते असें म्हटलें आहे. रात्रींपासूनच लाल किल्ल्याच्या मैदानांत लोक बसून राहिले होते. कांहीं तर पुढें जागा मिळावी म्हणून रात्रींच तेथें निजावयास गेले होते.



दिल्ली येथील लाल किल्ल्यावर तिरंगी ध्वज फडकाविला.



व्हाइसरॉय हाउसवरील झेंडा.

लाल किल्ला हा तेथील लोकांच्या डोळ्यांत सलत होता. पारतंत्र्याचें तें द्योतक आहे असें लोक मानीत असत. लाल किल्ला सर झाला म्हणजे हिंदुस्थान सर झाला अशी लोकांची भावना. त्याच ठिकाणीं मोंगल बादशहांचें वास्तव्य असे. तेथेंच आय्. एन्. ए. चा खटला झाला. गोऱ्या शिपायांच्या पलटणी तेथेंच सज्ज असत. स्वाभाविकपणेंच लाल किल्ल्यावर निशाण लागलेलें पहाण्याची लोकांना तळमळ होती.

सुभाषबाबूंच्या आझाद सैन्याची स्वारी लाल किल्ल्यावरच होणार होती. 'चलो दिल्ली' ची घोषणा याच स्थानाला उद्देशून होती. सकाळीं ९ वाजण्यापूर्वींच तीन तास विस्तीर्ण मैदान लोकांनीं काठोकाठ भरून गेलें होतें. दृष्टीच्या टप्प्यांत मावणार नाहीं इतक्या लांब पर्यंत हा लोकसागर पसरला होता.

पं. जवाहरलाल हिंदुस्थानचे पहिले पंतप्रधान हा झेंडा फडकवणार होते. तें आले तेव्हां गगनभेदी गर्जना झाल्या. दोन मिनिटांत झेंडा फडकला. लोकांच्या डोळ्यांचें पारणें फिटलें. डोक्यावर विमानांची घरघर सुरू झाली. जनतेचा आनंद गगनांत मावेना. ज्या घटनेकरतां वर्षानुवर्षं जनता तृषित झाली होती ती घटना घडली. कृतकृत्यतेचा आनंद लहानथोर स्त्रीपुरुषांच्या तोंडावर झळकूं लागला. जवाहरलालनीं बोलण्यास सुरवात केली. ते म्हणाले, " ज्यांनीं या निशाणाला वंदन केलें ते हिंदुस्थानाचे नागरिक आहेत व त्यांचा समान हक्कावर अधिकार आहे. आतां यापुढें हा हिंदु, तो मुसलमान, तो शीख असा भेदाभेद आमचें सरकार करणार नाहीं. सर्व सारखे होतील. एखाद्या धर्माच्या

मनुष्याला दुसऱ्या धर्माच्या माणसापेक्षां अधिक हक्क मिळणार नाहींत. हिंदुस्थानांतील ३० कोटी जनतेपैकीं प्रत्येकजण राजा आहे. कारण आपण जें कमावलें आहे, तें लोकराज्य कमावलें आहे. याचा अर्थ असा नाहीं कीं, मनाला वाटेल तसें आपण वागावें. दिल्लीनें पुष्कळ राजे पाहिले; पण राजांचे दिवस आतां संपले. आतां पंचायत राज्याचे दिवस सुरूं झाले. ''


नेहरूंनीं नंतर सुभाष बोस यांना अभिवादन केलें. त्यांनीं हिंदुस्थानचें तिरंगी निशाण हिंदुस्थानाबाहेर फडकावलें. सुभाषबाबूंचें नांव निघतांच जनतेनें टोप्या, रुमाल, काठ्या हवेंत उडवून आनंद व्यक्त केला.

नेहरू पुढें म्हणाले, ' आज हिंदुस्थानी आणि हिंदुस्थानी यांच्यामध्यें भिंत उभी करण्यांत आली आहे. आपण अशा रीतीनें वागूं या कीं, दोन देश एक होतील. खेड्यांतल्या जनतेनें आपल्याबरोबर ऐक्याचा व शांतीचा संदेश न्यावा. ''

अशा प्रकारें हिंदुस्थानच्या इतिहासांतील अत्यंत वैभवशाली समारंभ साजरा झाला. हिंदुस्थाननें १५ ऑगस्टला स्वातंत्र्याची मुहूर्तमेढ रोवली, आपली भूमि सुजला, सुफला, शस्यश्यामला करण्याची प्रतिज्ञा केली, देशांतून दैन्य, दारिद्र्य आणि विषमता यांचें उच्चाटन करण्याचा निर्धार केला आणि जगाला उच्च संस्कृति, थोर परंपरा व उज्ज्वल भवितव्य याचा संदेश दिला. या अभिनव भारताच्या निर्मितीला आपण आतां सुरुवात करीत आहों हेंच दिल्लीच्या स्वातंत्र्योत्सवानें सर्वांना गर्जून सांगितलें.

IRBF-0102625

IRBK-0102625



## शिरीष माला


१ गांधी–जीना पत्रव्यवहार ०८

२ कस्तुरबा ०६

३ लिली मोगरा ०८

४ ज्ञान–तुषार ०६

५ अमर चीन ०१०

६ सोव्हिएट राष्ट्रें व लोक ०१०

७ हिंदी स्वातंत्र्याच्या योजना ०१२

चित्रशाळा प्रेस,
प्रकाशन विभाग
पुणें २.